महाराष्ट्र शासन

**समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

दूरध्वनी क्र.२०-२६१२७५६९ ईमेल - sakalyangovthostel@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/स्वाधार/Renew/का-५/मुदतवाढ/२०२६-२७/3200 दिनांक: १५.०९.२०२६

प्रति,
मा.व्यवस्थापकीय संचालक,
स्वाधार महाआयटी कार्पोरेशन,
एपीजे हाऊस, ३ रा मजला, ३ दिनशॉ रोड,
केसी कॉलेजजवळ, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

विषय: सन २०२६-२७ या वर्षात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत नुतनीकरणाचे (Renew) ऑनलाईन अर्ज स्विकारण्यास मुदतवाढ देणेबाबत...

संदर्भ: आयुक्तालयाचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/स्वाधार/Renew/का-५/२०२६-२७/२५७८, दिनांक २८.०७.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज न करता थेट स्वाधार योजनेसाठी अर्ज केलेल्या व शासन पत्रातील निकष लागू असलेले विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यास मंजूरी मिळाली होती. त्यानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात स्वाधार योजनेच्या लाभासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या वर्षात स्वाधार योजनेच्या लाभाची रक्कम वेळेत अदा करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२६-२७ या वर्षात शासकीय वसतिगृह प्रवेश व स्वाधार योजनेकरीता प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जाची तपासणी विहित वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

स्वाधार योजनेच्या मागील वर्षात स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत दिलेली मुदत वाढविण्यात यावी याबाबत विद्यार्थी/पालक व क्षेत्रीय कार्यालयाकडून मागणी होत आहे.

या अनुषंगाने अनुसूचित जातीच्या वरील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्याची संधी मिळावी यासाठी मागील वर्षात स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक वर्षात ऑनलाईन अर्ज Renew करणेकरीताची मुदत **दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

विद्यार्थ्यास मागील वर्षाचे गुणपत्रक Upload करणे व चालू अभ्यासक्रमाची माहिती Update करणेकरीता ऑनलाईन अर्जात सुविधा उपलब्ध असावी.

तसेच जो विद्यार्थी सन २०२५-२६ या वर्षात अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकत होता व त्याला स्वाधार योजनेचा लाभ मिळालेला आहे. अशा विद्यार्थ्यांना या वर्षात वसतिगृह प्रवेशाकरीता ऑनलाईन अर्ज करता येत नाही. अशा विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहाकरीता ऑनलाईन अर्ज करण्याकरीता पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

१५/०९/२०२६

(विजयकुमार गायकवाड)
उपआयुक्त (शिक्षण)
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत: माहिती व कार्यवाहीस्तव.

१. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण (सर्व)
२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)